महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गातील "वैद्यकीय अधिकारी गट-अ" यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याबाबत. . .

आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
(महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,मुंबई ४००००१

शुध्दीपत्रक क्र.आसेआ/कक्ष-२अ/टे-६/वै.अ.गट-अ/क्रमांकः परिवि आदेश-२०२६/जा.क्र. 2063 /दि.६ ऑक्टोबर, २०२६

संदर्भ:- शासन आदेश क्रमांक:परिवी आदेश-२०२५/प्र.क्र.९१२/दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२५

<u>शुध्दीपत्रक :-</u>

शासनाचे संदर्भाधीन आदेशातील तक्त्यामधील अ.क्र.३८ येथील "डॉ. अमोल राजाराम बिरवटकर यांनी हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण दिनांक १९/०१/२०२० रोजी उत्तीर्ण केली आहे. तथापी संदर्भिय आदेशामध्ये आदेशामध्ये सदर बाब नमुद करण्यात आली नाही. डॉ. अमोल राजाराम बिरवटकर, वैद्यकीय अधिकारी यांना हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून दि.१९.०१.२०२० पासून सूट मिळालेली आहे. तथापि, उपरोक्त तक्त्यात त्यांचा परिविक्षा कालावधी दि.१९.०२.२०१९ रोजी समाप्त होवून स्तंभ ७ येथे नमूद केल्यानुसार त्यांची वैद्यकीय अधिकारी या पदावरील सेवा नियमितरित्या जरी दि.२०.०२.२०१९ पासून पुढे चालू होत असली तरी, त्यांच्या वेतनवाढी दि.१९.०१.२०२० पर्यंत रोखून त्या दिनांकापासून त्यांना वेतनवाढी देय होईल. सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनवाढी शासन निर्णय दिनांक ३० डिसेंबर,१९८७ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रोखल्यांनतर तद्नंतर भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यास सूट मिळाल्याच्या दिनांकापासून सदर अधिकाऱ्यास वेतनवाढी देय झाल्यांनतर त्यापुढील सर्व वेतनवाढी त्यांची कोणतीही वेतनवाढ रोखून धरण्यात आली नव्हती असे मानून त्यांना मिळतील. मात्र वेतनवाढ रोखल्यामुळे त्यांना ज्या प्रत्यक्ष वेतनास मुकावे लागले त्याची थकबाकी मिळण्याचा हक्क त्यांना राहणार नाही." असे वाचावे.

शासन पत्र क्रमांक: संकिर्ण-२०२६/प्र.क्र.७०/सेवा-१, दिनांक ०९ फेब्रुवारी २०२६ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभातील कार्यरत वैद्यकीय अधिकारी, एस-२० संवर्गातील अधिकारी यांचे परिविक्षाधीन कालावधी समाप्ती करण्याबाबतचे अधिकार सामान्य प्रशासन विभाग दिनांक २२ जून, २०२१ मधील अटी व शर्ती विहीत परिविक्षा कालावधीत पूर्ण करणा-या उमेदवारांचा परिविक्षा कालावधी पूर्ण केल्याचे अधिकारी आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना प्रत्यावर्तीत करण्यात आले आहेत. सदर प्रदान केलेल्या अधिकारानुसार आयुक्तालय स्तरावरुन शुध्दीपत्रक निर्गमीत करण्यात येत आहेत.

सदर शुध्दीपत्रक आयुक्तालयाच्या https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहेत.

(राजेंद्र भालेराव)
सहसंचालक, (प्रशासन)
आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

प्रति,
१) संबंधीत वैद्यकीय अधिकारी (संबंधित उपसंचालक, आरोग्य सेवा यांचेमार्फत)
२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)- १, महाराष्ट्र, मुंबई.
३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)- २, महाराष्ट्र, नागपूर.

Scanned with OKEN Scanner

४) महालेखापाल, लेखापरीक्षा- १, महाराष्ट्र, मुंबई.

५) महालेखापाल, लेखापरीक्षा- २, महाराष्ट्र, नागपूर.

६) उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ (सर्व)

७) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)

८) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

९) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)

१०) निवडनस्ती (कार्यासन -२अ )



Scanned with OKEN Scanner